**भंडारा जिल्हयातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणुक करिता ई- निविदा**

क्र. आसन-14/खनिज/कलि/कावी/20/2018
जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालय,
दिनांक : 10 / 01/2018

जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार ( Accredited Environment Consultant ) यांना कळविण्यात येते की, भंडारा जिल्हयातील सन 20017-18 व सन 2018-19 वर्षाकरिता वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी, Form 1/1 M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्यासाठी ई- निविदा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येत आहे. सदरील निविदेची कार्यवाही https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ई- निविदा प्रसिध्दी | 10/01/ 2018 | |
| ई- निविदा स्वीकृती स्वीकारण्याचा दिनांक | 17/01/2018 | वेळ 16.00 पर्यत |
| ई- निविदा उघडण्याचा दिनांक | 18/01/2018 | वेळ 16.00 |

**अटी व शर्ती**

1. ई-निविदा अर्ज शुल्क रु. 1000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.

2. पर्यावरण सल्लागार ( Accredited Environment Consultant ) mining of minerals या विभागात (Quality Council of India (QCI) किंवा National Accreditation Board for Eduction and Training या द्वारे मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे.

3. वाळू गटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी, Form 1/1 M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

4. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनी-10/0615/प्र.क्र.289/ख दि. 03/01/2018 केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि. 14 सप्टेंबर 2006 ( EIA Notification), दि. 15/01/2016 व दि. 03/03/2016 च्या तरतुदी लागू राहतील.

5. सदर निविदा भंडारा जिल्हयातील सन 2017-18 व सन 2018-19 वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळू गटांकरिता असेल. वाळू/ रेती सुधारीत धोरण 2018 प्रमाणे वाळूगटांचे अंतर 200 मी. पेक्षा कमी अंतर असल्यास सदर वाळूगट एकच असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

6. एका वाळू गटाकरिता सर्वात कमी किंमत ई निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र. 2,3 व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.

7. निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रिम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

8. पर्यावरण अनुमती प्राप्त करुन देणे, Form 1/1 M, EIA, EMP व Mining Plan केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि. 15/01/2016 च्या तरतुदीनुसार व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 20 दिवसात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

9. ज्या वाळूगटास राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय पर्यावरण समितीची मान्यता मिळाल्यावर पूर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.

10. वाळू लिलाव झाल्यावर संबंधित लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करुन देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधित लिलावधारकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.

11. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पर्यावरण बैठकीस mining of minerals प्रवर्गातील in-house expert हजर राहणे आवश्यक राहील व प्रतिनिधी पाठवण्यात येऊ नये व याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

12. निविदा मान्य झाल्यावर रु. 100/- च्या मुद्रांकनावर करारनामा करावा लागेल.

13.अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास देय असलेली पूर्ण रक्कम कपात करण्यात येईल अथवा अंशता: कपात करुन रक्कम देण्यात येईल.

14. देय असलेल्या रक्कमेतून नियमानुसार 2% आयकर (TDS) कपात करण्यात येईल.

15. कुठलीही पूर्वसुचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी भंडारा यांना राहतील.

16. अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी भंडारा यांना राहतील.
17. सदर प्रकरणी काही वाद उद्‌भवल्यास भंडारा न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडवण्यात येतील.
18. प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकरण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी भंडारा यांना राहतील.
19. मा. न्यायालय व मा. हरित लवाद वेळोवेळी जे आदेश देतील ते लागू राहतील.

20. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कागदपत्रे

**अ. तांत्रिक लिफाफा**

i. अट क्र.2 नुसार मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र.
ii. PAN card
iii. GST नोंदणी प्रमाणपत्र
iv. दोन वर्ष कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र
v. सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र (100/- रु. स्टँमपेपरवर)

**ब. आर्थिक लिफाफा**

i. सदर दर BOQ मध्ये सादर करुन BOQ अपलोड करावा.

21. ई-निविदा तांत्रिक व आर्थिक जिल्हा निविदा समितीच्या समोर उघडण्यात येतील.

जिल्हाधिकारी भंडारा

| BOQ Format | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Item No | Quantity | Unit | Estimated rate | Basic rate | Total Amount without Tax |
| 1 | 1 | District level per sand plot (Area 0 – 5 Ha) | 0 | | |
| 2 | 1 | State lever per sand plot (Area 5.1 – 50 Ha) | 0 | | |